३७९ यापरि नागयग हा, राज्यावरि बैसल्यावरी सगळे ।
पटवर्धनादि भट ते, संस्थानीं आपुल्या झणीं गेले ॥ १९ ॥

( शार्दूलविक्रीडित )

३८० झाले नाहित आठ मास बसुनी नारायणा गादिला ।
दादाची वनिताच कारण असे तन्नाशिं ती चंचला ॥
इच्छा गादिवरी रघूस बसण्या होती दुणावे अतां ।
या-योगें शपथा मुळीं न टिकल्या थेऊरिंच्या तत्वतां ॥ २० ॥

( स्रग्धरा )

३८१ राघोबा भ्रातृजाला बधि सदय नृपा गारद्याच्या-कडून ।
राज्येच्छेनें तयाला वध नरपतिचा वाटलाही कडू न ॥
राज्यप्राप्त्यर्थ त्याचा अजवरि रघुचा यत्न अत्यंत झाला ।
राजानें याचसाठीं अडकवुन तया ठेविलें रावबाला ॥ २१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

३८२ राघोबा मत बापुचें मिळवुनी ' नारायणाला धरा ' ।
ऐसें लीहुनि देइ पत्निजवळीं कृत्याच जी दुर्धरा ॥
दुष्टेनें खुडुनी ' ध ' अक्षर तिथें ' मा ' घातला हस्तकें ।
त्यायोगें बळि तें सहाहि पडले देऊनिया मस्तकें ॥ २२ ॥

३८३ इच्छाराम पडेच गाइसह तैं मागें अबाजी पडे ।
चाफाजी तिसरा पडे मग पुढें नाईक नाना पडे ॥
नारू फाटक खड्ग लागुन पडे नारायणाच्या-वरी ।
दुष्टांनीं मग चालवूनि असिला त्या घाडिलें हो वरी ॥ २३ ॥

( आर्या. )

३८४ बापूनें मन आहे, धरण्यालागीं कुणा न हें कळलें ।
पातक कधीं न दडतें, बहु दिन झाल्यावरी उघड पडलें ॥ २४ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

१३५ शिंदे-होळकरादिकीं अरिवरी चालून जाऊनिया ।
गोळ्याचीं अतिवृष्टि केलि यवनीं भाजून मारावया ॥
तैं भाऊ चमु आपुली झडकरीं सर्वांपुढें नेउनी ।
तोफांना सरबत्ति देउन अरी रंजीस आणी झणीं ॥ ६८ ॥

१३६ सव्वालाख चमू द्विजातिपतिची तोफेस तोफा भल्या ।
लागोनी रण माजलें अरिवरीं गोळ्या सुटूं लागल्या ॥
धूम्रानें सकला दिशा भरुनिया अंधार चोहींकडे ।
झाला त्यांतच वातही मिसळुनी आंग्लास मारी खडे ॥ ६९ ॥

१३७ शब्दांनीं मग धाड धाड सगळ्या दिङ्मंडळा व्यापिलें ।
पक्षी धावति भीउनी चहुकडे घेऊनि संगें पिलें ॥
जैशा शारद[1] दुर्दिनीं[2] चमकती आकाश भागीं विजा ।
तोफा सोडिति तैं तशाच दिसती ज्वाला दिसे ती मजा ॥७०॥

## ( स्रग्धरा )

१३८ झंझावातें रिपूची गडबड उसळे, सैन्य अंधार-योगें ।
श्रीमंताचें किती, हें मुंळि नच समजे आंग्ल घे पाय मागें ॥
आहे सेना किती हें तरुवर वसुनी पाहतां मुख्य झाला ।
गोलंदाजास तात्या कथि "लगव बघूं आंग्लमुख्यास टोला" ७१

## ( शार्दूलविक्रीडित )

१३९ त्यानें योग्य निशाण घेउन जवें गोळा तदा सोडिला ।
वृक्षाग्रासमवेत आंग्लि[3] पडला प्राणान्तही जाहला ॥
शिंदे होळकरादिकीं करपदां ज्याच्या मुळें गाळिलें ।
ते हे इष्टुर फाकडे त्यजुनिया युद्धा वरीं चालले ॥ ७२ ॥

१४० ज्यांची युद्ध-विशारदा सु-पृतना विप्रांस भंडाववी ।
ज्याचें 'फायर' झाडणें जबर जें धीराप्रती टाकवी ॥

१ शरदृतूंतील. २. अभ्राच्छादित दिवशीं. ३. स्टुअर्ट.

संगें त्या लिटलास घेउन सिग तैसें दुजाही स्थळा ।
भाऊ हस्तांकि आणण्या झपझपा तो उतरे चालला ॥ ९५ ॥

६९२ भाऊ म्हैसुरप्रांतिं जात असतां कात्रिज दुर्गाप्रती- ।
एका मागुन एक ते करुनिया पेठा बहू जाळिती ॥
दाणा वैरण संपली मिष असे भाऊ करी तो वरीं ।
जातां चित्रगडास तच्चमुवरी तच्छत्रु ये सत्वरीं ॥ ९६ ॥

६९३ होती ती चमु तीनशेंच सगळी भाऊ तिला कापुनी ।
घ्याया चित्रगडास यत्न करिती सैन्याप्रती घेउनी ॥
बंदोबस्त बरा असूनि गडही होता बहू भक्कम ।
सामादी हरता उपाय मग ये टेकीस विप्रोत्तम ॥ ९७ ॥

६९४ घ्याया चित्रगडास यत्न करणें सोडून देऊनिया ।
घेई दुर्ग दुजे पराक्रम अती लोकांस दावूनिया ॥
टिप्पूच्या सगळ्या प्रचंड विषयीं भाऊ दरारा खरा ।
तेव्हां बैसवि दावि तेज अपुलें सर्वांप्रती हा हिरा ॥ ९८ ॥

( आर्या )

६९५ हा पुरुषसिंह विजयी, रिपुच्या राज्यांत गर्जना करि जें ।
घाबरले जन सारे, जो तो पळण्याप्रतीच लागे तें ॥ ९९ ॥

६९६ त्या दुर्जन टिप्पूनें, पटवर्धन-वीर मारिले पूर्वी ।
तच्छासन हा टिपुला, करुनी डोळ्यातुनी टिपें अणवी॥१००॥

६९७ खेळांत बुदबळ्यांच्या, अश्वीं राजाच आडला जावा ।
मोहऱ्यानें मग दुसऱ्या, धुव्वा उडवून डावही व्हावा॥१०१॥

६९८ तैसा प्रकार झाला, टिप्पू अडकेच आपुल्या नगरीं ।
आंग्लांनीं शह दिधला, सुटण्या बहु यत्न तो करीहि अरी १०२

---

१ मुलखात.

# भाग ८ वा.

## [ शिरा विसंव-दर्शन ]

( आर्या )

६९४ श्रीरंगपट्टणाहुन, परतुन येतात भाउ तों त्यांना ।
करवीरावरि जाणें, भाग पडे चालली सकल सेना ॥ १ ॥

६९५ आरंभीं अप्पानें, बापाला कळविलाच मानस कीं ।
मी करितों मोहिम ही, करविरपाळास धाडितें नाकीं ॥ २ ॥

६९६ सेनेस घेउनी तो, अप्पा कोल्हापुराकडे गेला ।
अळत्यास शत्रुचमुचा, गांठुनि धुव्वाहि उडवुनी दिधला ॥ ३॥

६२७ आंग्लचमूंना लुटिलें, गांवामध्यें शिरून पेठांला ।
चमुपं जनार्दनानें, तोफांचा फार मार चालविला ॥ ४ ॥

६९८ अप्पांनीं गोळ्यांच्या, बाणांच्याही करून वृष्टीला ।
करविरसेना जर्जर, करुनी टेंकीस आणिली सकला ॥ ५ ॥

६२९ हें वृत्त नृपा कळतां, सर्जेरावास धाडिलें त्यांणीं ।
रत्नाकर सचिव सवें, केला हल्ला तदा उभयतांनीं ॥ ६ ॥

७०० अप्पास जखम लागे व्याकुल होवोनि भूमिवर पडला ।
विठ्ठल धोंडोबासह, बाबा फडणीसही पडे महिला ॥ ७ ॥

७०१ पालखिमाजीं अप्पा, घालुन नेला नृपास दावाया ।
राजानें गांव दिले, पांच तया बोलला वसा, या, या ॥ ८ ॥

७०२ भाऊस वृत्त लागे, अरमानें क्रोध त्यास नावरला ।
सेना जमवुन सारी, युद्धाला भाउ चालतां झाला ॥ ९ ॥

७०३ गंगाधर गोविंदा करुनी तोफा सुरू करी भाऊ ।
चिंतामण, रघुनाथा, बाबाही घेतले सवें भाऊ ॥ १० ॥

पूर्वापार असें जसा उभयतीं संबंध तो तत्वतां ।
मी पाळीन " नृपास लीहुन तदा झाला असें घाडितां ॥ ८ ॥

९८० नानाला बलहीन बाजि करण्या-साठी सुयुक्ती करी ।
आली ती सकला फसून उलटी त्याच्याच अंगावरी ॥
तें विद्या गुरुची गुरुस पुरतीं भोंवें तसें संप्रती ।
झाले छत्रपती न मोजि नृवरा बोलावि युद्धाप्रती ॥ ९ ॥

९८१ बाबूराव सचीव कैद करितां राजाप्रती बाजिनें ।
थत्ते पाठविले गडा परतुनी मागावया बाजिनें ॥
केलें छत्रपती वदेच सचिवा नानाचिया कैद मीं ।
आहें राखुनि हा सुदुर्ग अपुला आहां तुह्मी विभ्रमीं ॥ १० ॥

९८२ सांप्याळा वचनास आपण स्वयें अंकीत माझा असें ।
वागा या पुढतीं द्विजातिपतिहो सत्यास सिद्धी असे ॥
राजा सांगुनिया असेच न बसे जास्ती चमू ठेवूनी ।
सत्ता स्थापुनि आपुली पुनरपी स्वातंत्र्य लाभूं ह्मणीं ॥ ११ ॥

९८३ विप्रांची उपयोगि आज पडतें आज्ञाप्रती यादवी ।
ऐसें छत्रपतीस दाटून चमू गोळा करी तो नवी ॥
बाजीला कळतांच वृत्त गमलें ही पेशवाई भली ।
आतां खास बुडून जाऊन तिथें ती भोसलाई अली ॥ १२ ॥

९८४ रास्ते माधव सैन्य देउन सवें सातार-पालावरी ।
धाडी बाजि परी नृपें जितुनिया फेंटाळिलें त्या दुरी ॥
राजा घेऊन सैन्य बाजिवरती याया निघे जेधवां ।
झाली घाबरगुंडि विप्रपतिची भांबावला तेधवा ॥ १३ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

९८५ आतां संकट वारितो कवण हें झालें तयाला असें ।
भेटे त्यास सहाय आज मजला द्या हेंच प्रार्थीतसें ॥

१०२९ पटवर्धन वीरांचीं, संस्थानें होति त्या प्रदेशाला ।
झणुनी करविरपालीं, द्यावा संत्रास नित्य विप्रांला ॥ ५८ ॥

१०३० त्यांचीं युद्धें चालति, शत्रू बनुनीच राहिले होते ।
धोंडो गोखले यांचे, त्या बाजूलाच प्रांत होते ते ॥ ५९ ॥

१०३१ स्वाऱ्या करीत तेही, कोल्हापुरिं जाउनी नृपावरतीं ।
धन-वसनें लाभुनिया, मोठें सद्यश जवें सकल वरिती ॥ ६०॥

१०३२ सवाइ-माधव-मृत्यू-नंतर, धांदल पुण्यांत माजे जी ।
ती-मध्यें मुख्य असे, भाऊ योद्धा रणामधीं गाजी ॥ ६१ ॥

१०३३ झणुनी करविरपाला, यांच्या प्रांतांत धाड घालाया ।
संधी लाभे नामी, ते घेती भुदरदुर्गमा राया ॥ ६२ ॥

१०३४ भास्कररावापासुन, मनोळि घेऊनिया चिकोडीला ।
घेई करविरपालक, सुपीक भोंतालिच्या प्रदेशाला ॥ ६३ ॥

१०३५ हुबळी नलमधि शहरें, कर्णाटीं लुटुन फस्तही केली ।
संकेश्वराजवळच्या, वल्लभदुर्गींहि चाल मग केली ॥ ६४ ॥

१०३६ संवदलग्याचा किल्ला, आणुनि ताब्यांत एक स्वारीला ।
गोकाकेवर केलें, सपाद लक्षास घेइ खंडणिला ॥ ६५ ॥

१०३७ कित्तूरा मग गेले, खंडा, घेऊन कुन्नुरा गेले ।
देसाई मारुनिया, लुटुनी उध्वस्त तें नगर केलें ॥ ६६ ॥

१०३८ पाच्छापुरास जाउन, तेथुनिही खंडणी जमा केली ।
करवीरनृपाळानें, ऐसी बंडालि फार माजविली ॥ ६७ ॥

१०३९ नाना भाऊ यांच्या, वैरत्वा पाहुनी नृपानें ह्या ।
जाऊन तासगांवा, केल्या हर्म्यांस जाळुनी लाह्या ॥ ६८ ॥

१०४० तें तासगांव लुटुनी, चंदनि वाडा सबंध जाळून ।
रास्त्यावरि चाल करी त्याला असिनेंच काढि कापून ॥ ६९ ॥

